महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:

क्रमांक: २अ/एडीएम/DSE Vacancy/ २०२०/ ३५८ दिनांक : 11 DEC 2020

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परिगणनेकरिता तसेच EWS कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्याबाबत...

संदर्भ : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १२२०/ प्र.क्र.२०/ व्हिडिओ कॉन्फरन्स/२०२०/१२१४, दिनांक ११.१२.२०२०

वरील विषयाबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी संदर्भाधीन पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परिगणनेकरिता तसेच EWS कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्यासाठी https://dse२०.mahacet.org.in/de२०/ अशी लिंक उपलब्ध करुन दिलेली असल्याचे कळविले आहे.

सदर लिंकवर रिक्त जागांची परिगणना करुन ती माहिती भरण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावे. तसेच सदरहू माहिती दिनांक १८.१२.२०२० पर्यंत परिगणित करुन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना अवगत करण्याचेही कळविले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**

८वा मजला, न्यु एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com


क. तंशिप्र - १२२०/प्र.क्र २०/व्हीडीओ कॉन्फरन्स/२०२०/1214 दिनांक - 11 DEC 2020

प्रति,

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,

०३, महापालिका मार्ग,

मुंबई ४०० ००१

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत....**

संदर्भ : आपले पत्र क्र. ०२/एनजीसी/वि.सं.ब./मान्यता/२०२०/९२६ दिनांक ०२/१२/२०२०

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता द्वितीय वर्ष शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी शाखेच्या विद्यार्थ्यांचे संस्था बदल केल्याची नोंद थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीच्या पोर्टलवर करण्यासाठी संचालनायाच्या तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांना युझर आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती करण्यात आलेली होती.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांच्या परीगणनेकरीता त्याचप्रमाणे **EWS** कोटयातील रिक्त राहिलेल्या जागांची नोंदणी करण्यासाठी पुढील प्रमाणे लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**https://dse20.mahacet.org.in/dse20/**

आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालिल विभागीय कार्यालये व संस्थांना याबाबत आपल्या स्तरावर अचूक माहिती भरण्यासाठी त्वरीत अवगत करण्यात यावे व संबंधित माहिती एकत्रित संकलित करुन या कार्यालयास दिनांक १८/१२/२०२० पर्यंत निश्चितपणे उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन सदर माहितीचा उपयोग थेट द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मदत होईल.

**(श्री. चिंतामणी जोशी)** भा.प्र.से.

**आयुक्त,**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई**